नागरीकांची सनद
(जिल्हा न्यायालय गडचिरोली)

२६ ऑगष्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्हयातून वेगळा झालेला गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त म्हणून प्रसिध्द आहे. याचे भौगोलीक क्षेत्रफळ १४,९१,५००/- हेक्टर आहे. गडचिरोली जिल्हयामध्ये मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्र या तिनही राज्यांच्या सीमा सौमनूर येथे मिळतात. या जिल्हयांत वैनगंगा, प्राणहिता, गोदावरी, इंद्रावती यासारख्या प्रमुख नद्या वाहतात. तसेच पर्वतरांगा व वनसंपत्ती व लोखंड, चुनखडी, तांबे, दगडी कोळसा,बांबू,तेंदूपत्ता प अनेक खनिज संपत्तीनी संपन्न असलेला हा जिल्हा आहे.

या जिल्हयात कोसा उत्पादनासाठी आरमोरी हे गांव प्रसिध्द आहे तसेच अनेक निसर्गरम्य ठिकाणे व तिर्थस्थळे आहेत त्यात चामोर्शी जवळील वैनगंगा नदीच्या काठावरील मार्कंडा तर सिरोंचा जवळ प्राणहिता या नदीच्या काठावरील कालेश्वर मंदिर प्रसिध्द आहे

१) जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली हे दिनांक ०३/०७/२००४ पासुन अस्तित्वात आले त्यापूर्वी गडचिरोली जिल्हा हा चंद्रपूर जिल्हयांशी संलग्न होता त्यामुळे गडचिरोली जिल्हयांची प्रशासकीय कामे चंद्रपूर जिल्हा न्यायालयातून होत होती. दिनांक ०३/०७/२००४ पासून जिल्हा न्यायालय हे स्वतंत्र्यरीत्या काम करीत आहे. जिल्हा न्यायालय हे उच्च न्यायालय तथा विधी व न्याय विभागाच्या मार्गदर्शनानुसार तसेच निर्देशानुसार काम करते गडचिरोली येथे सध्या खालील न्यायालय कार्यरत आहेत.

१) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली.
२) जिल्हा न्यायालय-१ तथा अपर सत्र न्यायालय, गडचिरोली.
३) तदर्थ जिल्हा न्यायाधिश-१ तथा अपर सत्र न्यायाधिश, गडचिरोली.
४) तदर्थ जिल्हा न्यायाधिश-२ तथा अपर सत्र न्यायाधिश, गडचिरोली.
५) मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली.
६) दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), गडचिरोली.

तसेच सहा सह दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, गडचिरोली यांची न्यायालये कार्यरत आहेत. तसेच गडचिरोली जिल्हयातील एकुण १२ तहसिल पैकी गडचिरोली व्यतीरिक्त आरमोरी, देसाईगंज (वडसा), अहेरी, व सिरोंचा येथे कनिष्ठ न्यायालय सध्या कार्यरत आहेत.

२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, हे जिल्हायांचे प्रमुख न्यायाधिश, असून जिल्हयातील सर्व न्यायालयांचे न्यायीक व प्रशासकीय प्रमुख म्हणुन कामकाज पाहतात व इतर कनिष्ठ न्यायालये त्यांच्या अधिपत्याखाली कामे करतात.

फौजदारी प्रकरणांसाठी मुख्य न्यायदंडाधिकारी हे जिल्हयाच्या ठिकाणी प्रमुख न्यायीक अधिकारी असून फौजदारी प्रकरणे ही त्यांचे न्यायालयात दाखल केली जातात व त्यानंतर क्रमवारीने प्रत्येक न्यायालयाकडे प्रकरणे पाठविण्यांत येतात

दिवाणी मामल्यांसाठी दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) हे जिल्हयाच्या ठिकाणी मुख्य न्यायीक अधिकारी असतात. दिवाणी प्रकरणे सुरवातीला दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात दाखल करण्यात येतात व त्यानंतर ती सहदिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) यांचेकडे क्रमवारीने पाठविण्यांत येतात.

दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) यांचेकडे रु. १,००,०००/-(रु. एक लाख) पर्यतची दिवाणी दावे चालविण्याचे अधिकार असतात तर दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात रुपये १,००,०००/-च्या वरची प्रकरणे चालविण्यात येतात. तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात भुसंपादनाच्या तसेच कामगारांसाठी नुकसान भरपाईची प्रकरणे तसेच हिंदु विवाह कायदा यासारखे विशेष कायदया अंतर्गत प्रकरणे चालविल्या जातात.

कनिष्ठ न्यायालयात दिवाणी व फौजदारी मामल्यात निर्णय झाल्यानंतर त्यावरचे अपील जिल्हा न्यायालयात दाखल करण्यांत येते. तसेच काही भारतीय दंड विधान च्या कलम ३०२, ३७६ प्रमाणे खुन व बलात्काराची प्रकरणे कनिष्ठ न्यायालयात दाखल केली जातात, त्यानंतर जिल्हा न्यायालयाकडे सुनावणीसाठी सुपूर्द केली जातात. मोटार अपघात तसेच विशेष कायदयाअंतर्गत जसे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, महाराष्ट्र विद्युत मंडळ, अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच निवडणूक याचीका जिल्हा विशेष न्यायालयात दाखल करण्यात येतात.

न्यायाधिशांना न्यायदान करतांना नेहमी दोनप्रकारे भुमिका बजवावी लागते, दिवाणी दाव्यांच्यावेळी त्यांना दिवाणी न्यायाधिश म्हणून संबोधले जाते तर फौजदारी गुन्हांचे खटले निकालात काढतांना त्यांना न्यायदंडाधिकारी म्हणून काम करावे लागते

उच्च न्यायालयाचे निर्देशान्वये जिल्हा न्यायाधिशांना तसेच तालुक्याच्या न्यायाधिशांना खालील प्रमाणे अधिकार असतात.

| | दिवाणी | फौजदारी |
|---|---|---|
| १) जिल्हा व सत्र न्यायाधिश | कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयावर झालेल्या अपीलांची सुनावणी जिल्हा न्यायालयात चालते | सत्र न्यायाधिशांना कोणतीही शिक्षा देता येते परंतु मृत्युदंड दिल्यास उच्च न्यायालयात शिक्षा कायम होण्यासाठी प्रस्ताव पाठवावा लागतो, |
| २) अपर जिल्हा व सत्र न्यायाधिश | कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयावर झालेल्या अपीलांची सुनावणी जिल्हा न्यायालयात चालते | अतिरीक्त सत्र न्यायाधिश यांनी मृत्युदंडासह कोणतीही शिक्षा देण्याचे अधिकार असतात. |
| ३) मुख्य न्यायदंडाधिकारी | ------ | मुख्य न्यायदंडाधिकारी यांना ७ वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा व अमर्यादित दंड अधिकार असतात.. |
| ४) दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) | सर्व प्रकारची १,००,०००/- रुपयेच्या वरचे दिवाणी दावे, भुसंपादनाचे तसेच कामगारांना नुकसान भरपाई देण्याबाबतची प्रकरणे तसेच हिंदु विवाह विशेष कायदयाअंतर्गत ची प्रकरणे चालविण्याचा अधिकार दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) यांना असतो | ------ |
| ५) दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी | १,००,०००/- पेक्षा कमी असलेले दिवाणी दावे चालविण्याचा अधिकार या न्यायालयाला असतो | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांना ५,०००/- रुपये पर्यंत दंड व ३ वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा देण्याचा अधिकार असतो. |

जिल्हा न्यायालयात प्रबंधकाचे एक पद असते. प्रबंधक हे जिल्हा न्यायाधिश व इतर कर्मचाऱ्यांच्या मधील दुवा असतो. तसेच अधिक्षकांची दोन पदे असतात त्यात एक अधिक्षक (प्रशासन/वित्त) तर दुसरे अधिक्षक (न्यायीक) म्हणुन काम पाहतात. अधिक्षक (प्रशा/वित्त) प्रशासन, आस्थापना वित्त व बांधकाम इत्यादी विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहतात तर अधिक्षक न्यायीक हे सांख्यिकी, निरिक्षण, अभिलेखागार व मोटार अपघात दावे या विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहतात. प्रत्येक विभागासाठी एक सहाय्यक अधिक्षक, वरिष्ठ लिपीक व त्यानंतर कनिष्ठ लिपीक प्रमुख बेलीफ, शिपाई वर्ग अशा प्रकारे सर्व विभागामधे कर्मचाऱ्यांची रचना केलेली असते.

दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात अधिक्षकाचे एक पद असते ते प्रशासकीय व न्यायीक विभागाचे काम पाहतात तसेच या न्यायालयात २ सहाय्यक अधिक्षक, वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक, मुख्य बेलीफ, शिपाई अशी कर्मचाऱ्यांची रचना असते तर तालुक्याच्या न्यायालयात एक सहाय्यक अधिक्षक, वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक अशी नोटीसांची तामीली करणांरा बेलीफ वर्ग अशी रचना आहे.

न्यायालयातील कर्मचारी वर्ग हा न्यायाधिशांना न्यायालयातील प्रकरणांची दैनंदिन यादी तयार करणे दिवाणी व फौजदारी प्रकरणे न्यायाधिशांसमोर ठेवणे, मराठी व इंग्रजी मधुन साक्षदारांची बयाणे नोंदविणे, न्यायाधिशांनी उद्घोषित केलेले न्याय निर्णय लघुलिपीमध्ये घेवून ते टंकलिखीत करून देणे तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे प्रकरणांची अद्यावत ताळेबंद (Balance Sheet) ठेवणे तसेच निर्णीत अभिलेख नस्तीबध्द करून अभिलेखागारात पाठविणे इत्यादी कामे करावी लागतात. तसेच इतर कर्मचारी आस्थापनेवरील इतर प्रशासकीय कामे करतात

३) दिवाणी व फौजदारी मामले न्यायालयात दाखल झाल्यापासून न्यायाधिश सदरचे मामले लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत प्रयत्नशिल असतात.

४) प्रत्येक न्यायीक अधिकाऱ्यांना ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार न्यायीक प्रकरणे निकाली काढणे आवश्यक असते. तसेच शासनाचे मराठी भाषेचा वापर हे धोरण गडचिरोली न्यायीक जिल्हयात राबविले जाते. न्यायदानाचे काम जास्तीत जास्त मराठीतून केल्या जाते.

तसेच कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या पदनिहाय कर्तव्यसुची तयार केलेली असते त्यानुसार कार्य करावे लागते.

५) न्यायीक अधिकारी व कर्मचारी हे त्यांचेकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी कायदयाची पुस्तके, दिवाणी प्रक्रीया संहिता, दिवाणी नियम पुस्तिका, फौजदारी प्रक्रीया संहिता, फौजदारी नियम पुस्तिका, महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच आकस्मिक खर्च नियम, महाराष्ट्र कोषागार नियम तसेच शासनाचे तसेच वेळोवेळी येणारे उच्च न्यायालयाचे परिपत्रकाच्या आधारे कार्यालयीन कामकाज करण्यात येते.

६) न्यायालयामध्ये न्यायदानाचे काम हे प्रमुख असल्यामुळे दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे मामले व त्यासंबंधातील दस्तऐवज न्यायालयात असतात तसेच न्यायालयात काम करणा-या कर्मचा-यांचे वेतन तसेच इतर प्रशासकीय बाबी मधील दस्तऐवज कार्यालयात असतात.

७) जिल्हा न्यायालय आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्यांची अमलबजावणी करण्यासाठी सल्लागार समिती नेमलेली असते त्यामध्ये प्रमुख जिल्हा न्यायाधिश हे अध्यक्ष असतात तर जिल्हा न्यायाधिश १ व सत्र न्यायाधिश, मुख्य न्यायदंडाधिकारी, दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) हे सदस्य असतात. ते कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, पदोन्नती, आगावु वेतनवाढ. याबाबतीत सर्वानुमते ठराव घेवुन प्रश्न निकालात काढतात.

तसेच लोकांकडून कर्मचाऱ्याविरूध्द निवेदने आली असल्यास निराकरण प्रमुख जिल्हा न्यायाधिश करतात

८) न्यायालयात येणाऱ्या अशिक्षित गरजू व्यक्तींना न्यायालयातील प्रक्रीयेचे ज्ञान असणे आवश्यक असते. तसेच आर्थिक दृष्टया कमकूवत असलेल्या व्यक्तीसाठी कायदे विषयक सहाय्य व सल्ला देण्याचे काम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण करते. प्राधिकरणाचे सदस्य सचिव दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) हे असतात तर अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश असतात.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची मासिक सभा घेतली जाते यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य सचिव तसेच, पोलीस अधिक्षक व जिल्हाधिकारी हे हजर असतात किंवा त्यांचे प्रतिनिधी त्यांचे गैरहजेरीत सभेमध्ये हजर राहतात. तसेच त्यामध्ये समाजसेवक त्या त्या गावातील सन्मानिय नागरीक सभेला हजर राहतात. सदर्हु सभेमध्ये सामाजिक समस्यांबाबत चर्चा करण्यात येते तसेच त्या समस्यांच्या निराकरणाबाबतचे उपाय शोधले जातात.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे निरनिराळे उपक्रम चालविले जातात. त्यामध्ये लोक न्यायालय, कार्यशाळा तसेच जनजागृतीसाठी शिबीरांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये कायदेतज्ञ निरनिराळया कायदयाबाबतची माहिती देतात. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे घेतल्या जाणाऱ्या लोकन्यायालयामध्ये तडजोड होण्यासारखी दिवाणी व फौजदारी प्रकरणे ठेवली जातात. तसेच मोटार अपघाताची, बँकेची प्रकरणे किंवा किरकोळ गुन्हयातील प्रकरणे, तसेच पोटगीसंबंधीची प्रकरणे ठेवली जातात व अशी प्रकरणे लोकन्यायालयातील तीन सदस्यांच्या पॅनलसमोर ठेवली जातात त्यात एक न्यायाधिश, एक वकील, तसेच एक समाजसेवक यांचा समावेश असतो पॅनलवरील सदस्य हे दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकुन त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणतात व प्रकरणे निकाली काढतात. त्यामुळे पक्षकारांचा वेळ, पैसा तसेच त्यांचा मानसिक व शारिरीक त्रास वाचतो.

९) दिवाणी व फौजदारी नियमपूस्तिका तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशानूसार न्यायालयाचे कामकाज चालते.

१०)न्यायीक अधिकाऱ्यांना शेट्टी आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाप्रमाणे वेतन देण्यांत येते. तर कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन देण्यात येते.

तसेच न्यायीक अधिकारी/कर्मचारी यांचा सेवेत असतांना मृत्यु झाल्यास मृत्यु-नि-सेवा उपदान तसेच गटविमा योजनांचा तसेच लिंक इन्शुरन्स तसेच त्याचे इतर जसे भविष्य निर्वाह निधी, रजा रोखीकरण असे लाभ देण्यांत येतात.

११) अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्चाचे तसेच इतर कार्यालयीन खर्चाचे वार्षिक अर्थसंकल्प तयार करण्यांत येवून ते शासनाकडे पाठविल्या जाते ते मंजुर झाल्यानंतर, प्रत्येक तालुका स्तरावरील न्यायालयाकरीता त्यांच्या मागणी प्रमाणे पुरविण्यात येते.

१२) दंड रूपाने शासनाकडे जमा झालेल्या रकमांपैकी काही रक्कम सबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीला त्यांच्या त्या ग्रामपंचायतीकडून दंड रूपाने जमा झालेल्या प्रमाणात त्यांना अर्थसहाय्य पुरविण्यात येते. तसेच जिल्हा तसेच तालुका स्तरावरील वकील संघटनेच्या ग्रंथालयाना सहाय्यक अनुदान पुरविण्यात येते.

१३) प्रमुख जिल्हा न्यायाधिश हे न्यायालयातील वकीलांचे काम करणाऱ्या कारकुनांचा त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वकीलांचे कारकून म्हणून परवाने देण्यांत तसेच न्यायालयातील कामकाजाचा आढावा घेवून आवश्यकतेनुसार अर्जनवीसांना परवाना देण्यांत येतो.

१४) जिल्हा न्यायालयामध्ये संगणकीकरण झालेले असून जनसामान्यांच्या माहितीसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्यांत आलेले आहे. त्यामध्ये दिवाणी तथा फौजदारी प्रकरणांबाबतची सर्व माहिती कोणत्याही वेळी प्राप्त होवू शकते. तसेच कार्यालयीन कामकाज संगणकावर केल्या जाते.

तसेच शासनानी किंवा उच्च न्यायालयाने वेळोवेळी मागीतलेली माहिती फॅक्सद्वारे किंवा ई-मेलद्वारे त्वरीत पुरविल्या जाते. तसेच आवश्यकता असल्यास व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे न्यायालयातील प्रकरणात साक्षदारांची साक्ष नोंदविली जाते. तसेच उच्च न्यायालयाशी महत्वाच्या बाबींवर व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला जातो.

१५) केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालयाने, प्रबंधक जिल्हा न्यायालय, गडचिरोली यांना "जन माहिती अधिकारी" तसेच अधिक्षक (वित्त/प्रशा.) व सहाय्यक अधिक्षक (अभिलेखागार) यांना "सहाय्यक जनमाहिती अधिकारी" तसेच अपीलीय प्राधिकारी म्हणुन तदर्थ जिल्हा न्यायाधिश-१ व अपर सत्र न्यायाधिश, गडचिरोली यांची नियुक्ती केलेली आहे. जिल्हा न्यायालयाचे आदेश क्रमांक, बी-४(४९)/प्रबंधक/११/२००७, दिनांक ०९ जानेवारी, २००७ अन्वये माहिती अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

१) जनमाहिती अधिकारी — प्रबधंक,
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.

२) सहाय्यक जनमाहिती अधिकारी -- १) अधिक्षक (वित्त/प्रशा)
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.

२) सहाय्यक अधिक्षक(अभिलेखागार)
जिल्हा न्यायालय, गडचिरोली.

३) अपीलीय प्राधिकारी -- तदर्थ जिल्हा न्यायाधिश-१ व
सत्र न्यायाधिश,गडचिरोली.

या विभागातील विविध विभागाकडे जनतेकडून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना अधिनियमात विहित केलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत माहिती अधिकाऱ्यांकडून उत्तर पाठविले जाते तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यांकडून या संबंधातील अपीलांना विहित ३० दिवसात सुनावणी करून उत्तर दिले जाते. तसेच कार्यालयातील कामकाजाच्या विलंबास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने लागू केलेल्या अधिनियम, २००५ नुसार प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढण्याची जबाबदारी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांवर आहे. या संबंधात विवरणपत्र-१ सोबत जोडले आहे.

( गु.मा. कुबडे ),
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
गडचिरोली.

विवरणपत्र-१

नागरीकांची सनद (Citizen Charter)

| कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणाऱ्या सेवा (स्तर नमूद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकाऱ्याचे नांव नमूद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारीत असल्यास विहित/सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली | १) जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे<br><br>२) जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अपीलांना उत्तरे<br><br>३) कार्यालयातील कामकाजाच्या विलंबास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने लागू केलेल्या अधिनियम, २००५ नुसार प्रकरणे विहित कालावधीत निकाली काढणे | १) सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्जकरावा. अर्जावर रु. १२/- चे कोर्ट फी स्टॅम्प तिकिट लावावे<br><br>२) सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जावर रु २०/- चे कोर्ट फी स्टॅम्प तिकिट लावावे<br><br>३)--- | १) विभागात पदनिर्देशित केलेले संबंधित जनमाहिती अधिकारी.<br><br>२) नियुक्त केलेले संबंधित अपिलीय प्राधिकारी<br><br>३) संबंधित विभाग | १) माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवस सहायक अधिकाऱ्यांकडे परस्पर अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३५ दिवस.<br><br>२) अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवस<br>३) सर्वसाधरण ४५ दिवस. | १)अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवस उत्तर मिळाल्यापासून ९० दिवसात मुख्य माहिती आयुक्त यांच्याकडे<br><br>३) --- | ---<br><br>---<br><br>३) संबंधित कार्यालयाचे अवर सचिव/उप/सह सचिव यांच्याकडे तक्रार करता येईल |

( गु.मा. कुबडे ),
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
गडचिरोली.